गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अल्प पावसाने खरीप पिके संकटात; विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

मराठवाड्यात जून आणि जुलै महिन्यात झालेल्या अत्यल्प व खंडित पावसामुळे खरीप हंगामातील पिके गंभीर संकटात सापडली आहेत. पावसाचा मोठा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून अनेक भागांत सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आणि मका या पिकांची वाढ खुंटली आहे. परिणामी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत तातडीने भरपाई मिळावी आणि पीक विम्याच्या कक्षेबाहेर राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात आमदार लोणीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र पाठवून मराठवाड्यातील सद्यस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. पावसातील दीर्घ खंडामुळे अनेक भागांतील विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत घट होत आहे. त्यामुळे केवळ पिकांचाच प्रश्न निर्माण झाला नसून आगामी काळात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता याबाबतही गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन ३१ जुलै २०२६ रोजी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज भरण्याची मुदत किमान १५ दिवसांनी वाढविण्याची मागणी करण्यात आली होती. शासनाने या मागणीची दखल घेत मुदतवाढ दिल्याबद्दल आमदार लोणीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले. मात्र, सध्याची पिकांची परिस्थिती पाहता केवळ विमा अर्जासाठी मुदतवाढ देणे पुरेसे नसून प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



नुकसानग्रस्त सर्व पिकांचे तातडीने प्रत्यक्ष पंचनामे करावेत, पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई विलंब न करता मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच पीक विम्याच्या कक्षेबाहेर राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

सोयाबीनसह सर्व खरीप पिकांसाठी हेक्टरी विशेष नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी लोणीकर यांनी केली आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होणार असल्याने पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन कर्जाचे पुनर्गठन करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

पुढील हंगामात शेतकऱ्यांना पुन्हा पिकांची उभारणी करता यावी यासाठी बियाणे, खते आणि अन्य कृषी निविष्ठांसाठी विशेष मदत उपलब्ध करून द्यावी, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

अल्प पावसाचा परिणाम शेतीबरोबरच पशुधनावरही होण्याची शक्यता असल्याने जनावरांसाठी चारा डेपो आणि आवश्यकतेनुसार चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. जनावरांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठीही तातडीच्या उपाययोजना कराव्यात.

गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा. परिस्थितीचा गावनिहाय आढावा घेऊन ज्या भागात गंभीर परिस्थिती आहे, त्या भागात दुष्काळसदृश परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही आमदार लोणीकर यांनी (पान २ वर)

# चंदनझिरा पोलीस ठाण्याला मिळणार हक्काची अद्ययावत इमारत!

## एमआयडीसीतील त्रिमूर्ती चौकात नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीचे आज भूमिपूजन

**जालना । प्रतिनिधी**

सन २०१४ मध्ये स्थापना झाल्यापासून आयटीआय महाविद्यालयाच्या इमारतीतून कारभार पाहणाऱ्या चंदनझिरा पोलीस ठाण्याला आता हक्काची आणि अद्ययावत इमारत मिळणार आहे. जालना एमआयडीसी परिसरातील त्रिमूर्ती चौक येथे नवीन पोलीस ठाण्याची सुसज्ज इमारत उभारण्यात येणार असून, या इमारतीचे भूमिपूजन गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या स्थापनेला १२ वर्षांचा कालावधी झाला आहे. मात्र, स्थापनेपासून आजपर्यंत पोलीस ठाण्याचे कामकाज आयटीआय कॉलेजच्या इमारतीत सुरू आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिक परिसराचा विस्तार, गुन्ह्यांच्या तपासाचे वाढते प्रमाण, कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी तसेच नागरिकांच्या तक्रारी आणि पोलीस दलाचे प्रशासकीय कामकाज यामुळे स्वतंत्र व प्रशस्त इमारतीची गरज सातत्याने जाणवत होती. ही गरज लक्षात घेऊन गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून चंदनझिरा पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारत मंजूर करण्यात आली आहे. शासनाकडून मंजूर निधीतून एमआयडीसीतील त्रिमूर्ती चौक येथे ही नवीन इमारत उभारण्यात येणार आहे.

नवीन इमारतीमुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक प्रशस्त आणि चांगल्या कार्यपरिसरात काम करता येणार आहे. तसेच तक्रारदार व नागरिकांसाठीही अधिक सुरक्षित (पान २ वर)

# राखी पौर्णिमेनिमित्त जालना बाजारपेठेत उत्साह; राख्या खरेदीसाठी महिलांची गर्दी

## विविध रंग, आकर्षक डिझाईन आणि फॅन्सी राख्यांनी बाजारपेठ सजली; बहिण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या सणाची जय्यत तयारी

**जालना । प्रतिनिधी**

रक्षाबंधन अर्थात राखी पौर्णिमा अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने जालना शहरातील बाजारपेठा विविध रंगांच्या, आकर्षक डिझाईनच्या आणि फॅन्सी राख्यांनी सजल्या आहेत. राखी खरेदीसाठी महिला व युवतींची बाजारपेठेत मोठी गर्दी होत असून, सणाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. बहिणींकडून आपल्या भावासाठी आवडीची व आकर्षक राखी निवडण्याची लगबग सुरू झाली आहे.



रक्षाबंधन हा हिंदू संस्कृतीतील भाऊ-बहिणीच्या प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचे प्रतीक मानला जाणारा महत्त्वाचा सण आहे. या दिवशी बहीण भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची, सुख-समृद्धीची प्रार्थना करते, तर भाऊ बहिणीचे संरक्षण करण्याचा संकल्प करतो. काळानुसार या सणाच्या स्वरूपात बदल झाले असले तरी भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम आणि आपुलकीचे महत्त्व आजही कायम आहे.

जालना शहरातील विविध बाजारपेठांमध्ये यंदा पारंपरिक राख्यांसोबतच फॅन्सी, मोत्यांच्या, कुंदन, रुद्राक्ष, कार्टून कॅरेक्टर, म्युझिकल तसेच आकर्षक कलाकुसर केलेल्या राख्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी विविध कार्टून पात्रांच्या राख्यांना विशेष मागणी असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी भाऊ-बहिणीच्या नावाच्या किंवा फोटोच्या स्वरूपातील वैयक्तिक राख्याही उपलब्ध आहेत.

राखी बांधल्यानंतर भावाला भेटवस्तू देण्याची प्रथा वाढत असल्याने कपडे, घड्याळे, परफ्यूम, चॉकलेट, मिठाई तसेच इतर वस्तूंच्या खरेदीलाही वेग आला आहे. काही बहिणी भावासाठी खास गिफ्ट पॅक खरेदी करताना दिसत आहेत. त्यामुळे राख्यांसोबतच मिठाई व भेटवस्तूंच्या दुकानांमध्येही ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात सण साजरे करण्याच्या पद्धती बदलल्या असल्या तरी रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटून राखी बांधण्याची परंपरा आजही जिवंत आहे. काही कारणास्तव भाऊ किंवा बहीण दूर असतील तर ऑनलाइन राखी पाठविणे, कुरिअरद्वारे भेटवस्तू पाठविणे तसेच व्हिडिओ कॉलद्वारे शुभेच्छा देण्याचे प्रमाणही वाढले आहे.

रक्षाबंधनाच्या परंपरेला भारतीय संस्कृतीत मोठे महत्त्व आहे. राखी ही केवळ धाग्याची वस्तू नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि संरक्षणाचे प्रतीक मानली जाते. इतिहासातही राखीच्या माध्यमातून बंधुभाव, संरक्षण आणि (पान २ वर)

# ग्रामरोजगार सेवकांच्या प्रश्नांसाठी जिल्हाव्यापी आंदोलन उभारणार

**जालना - प्रतिनिधी**

सिटू संलग्न ग्रामरोजगार सेवक संघटनेची जिल्हाव्यापी बैठक आज जालना येथील सिटू भवन, संजय नगर, जालना येथे उत्साहात व निर्धारपूर्वक पार पडली. या बैठकीमध्ये ग्रामरोजगार सेवकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामरोजगार सेवकांना कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून मान्यता देण्यात यावी, तसेच ३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी बैठकीत करण्यात आली.



ग्रामरोजगार सेवक ग्रामीण भागात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मात्र, अनेक वर्षे सेवा करूनही त्यांना स्थैर्य, योग्य मानधन आणि कर्मचारी म्हणून आवश्यक हक्क मिळत नाहीत. रोजगार सेवकांवर झालेला अन्याय दूर करून त्यांच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हाव्यापी आंदोलन उभारण्याचा ठाम निर्णय बैठकीत घेण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण (पान २ वर)

# २५ ब्लॅक स्पॉटवरील उपाययोजनांचा आढावा; दोदडगाव नवा अपघातप्रवण स्थळ

## रस्ता सुरक्षेसाठी प्रशासनाचा ‘अॅक्शन मोड’; राजूर-जालना व जालना-वडीगोद्री मार्गावरील धोकादायक विहिरींवरही उपाययोजना करण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि अपघातप्रवण ठिकाणांवरील संभाव्य धोके लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने रस्ता सुरक्षेच्या उपाययोजनांना अधिक गती देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या २५ वरील उपाययोजनांचा सविस्तर आढावा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत संबंधित विभागांनी केलेली कामे, प्रलंबित उपाययोजना आणि आवश्यक अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था यांचा आढावा घेत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. याशिवाय अंबड तालुक्यातील दोदडगाव येथे वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत हे ठिकाण नवीन म्हणून घोषित करण्यात आले आहे. या ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी गतिरोधक आणि यांसारख्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच भोकरदन-जालना मार्गावरील नांजा फाटा येथे गतिरोधक बसविण्यास जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने परवानगी दिली आहे. मागील जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील २५ अपघातप्रवण स्थळे निश्चित करण्यात आली होती. या ठिकाणी अपघातांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत प्रत्येक वरील सद्यस्थितीचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात आला. कोणती कामे पूर्ण झाली आहेत, कोणती कामे प्रलंबित आहेत, कोणत्या ठिकाणी आणखी सुरक्षा उपाययोजनांची गरज आहे, याबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष ठिकाणी उपाययोजनांची अंमलबजावणी झाली आहे की नाही, याची पडताळणी करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या. अंबड तालुक्यातील दोदडगाव येथे वारंवार अपघात होत असल्याने या ठिकाणाची नव्या म्हणून नोंद करण्यात आली आहे. या परिसरातील अपघातांचे स्वरूप आणि संभाव्य धोके लक्षात घेऊन रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

वाहनचालकांना पुढील धोकादायक ठिकाणाची पूर्वसूचना मिळावी तसेच वाहनांचा वेग नियंत्रित व्हावा, यासाठी गतिरोधक आणि बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या उपाययोजनांची अंमलबजावणी प्राधान्याने करून अपघातांची पुनरावृत्ती रोखण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. रस्त्यालगत असलेल्या उघड्या किंवा असुरक्षित विहिरींचाही मुद्दा बैठकीत गंभीरपणे चर्चेत आला. राजूर-जालना तसेच जालना-वडीगोद्री मार्गावर रस्त्यालगत असलेल्या



विहिरींमुळे वाहनचालकांसाठी धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. रस्त्यावरून रात्रीच्या वेळी वेगाने जाणाऱ्या वाहनांना अशा विहिरींचा अंदाज न आल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित विभागाने अशा ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. गरजेनुसार विहिरींच्या ठिकाणी सुरक्षा कठडे, बॅरिअर, रिफ्लेक्टर आणि इतर रस्ता सुरक्षा साधने बसविण्याची कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

भोकरदन ते जालना मार्गावरील नांजा फाटा येथे गतिरोधक बसविण्याबाबत नागरिकांकडून करण्यात आलेल्या मागणीचीही बैठकीत दखल घेण्यात आली.

या परिसरात वाहनांचा वेग नियंत्रित करणे आणि स्थानिक नागरिक तसेच प्रवाशांची सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने गतिरोधकाची आवश्यकता असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. त्यानुसार जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने नांजा फाटा येथे नियमानुसार गतिरोधक बसविण्यास परवानी दिली असून संबंधित विभागाला पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

रस्ता सुरक्षेच्या उपाययोजनांसोबतच राष्ट्रीय महामार्ग आणि संबंधित रस्त्यांच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर करण्यात आलेल्या कारवाईचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अनुषंगाने रस्त्याच्या हद्दीत असलेली अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या बाबींवर कायदेशीर प्रक्रिया करून कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

संबंधित विभागांनी कोणत्या ठिकाणी नोटिसा बजावल्या, किती बांधकामे किंवा अतिक्रमणे हटविण्यात आली, कोणती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची माहिती बैठकीत घेण्यात आली.

रस्त्यालगतचे अतिक्रमण हे केवळ वाहतुकीस अडथळा ठरत नाही, तर अनेक वेळा वाहनचालकांना अचानक मार्ग बदलण्यास भाग पाडते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढू शकतो. या पार्श्वभूमीवर अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईलाही रस्ता सुरक्षा उपाययोजनांचा महत्त्वाचा भाग मानण्यात आला आहे. ब्लॅक स्पॉटवरील उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. संबंधित विभागांनी केलेल्या कामांची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन करण्यात येणार आहे. यामध्ये संबंधित ठिकाणी गतिरोधक सुरक्षा फलक आदी उपाययोजना प्रत्यक्ष बसविण्यात आल्या आहेत का, त्या कार्यरत आहेत का आणि त्यांचा वाहनचालकांना प्रत्यक्ष फायदा होत आहे का, याची तपासणी केली जाणार आहे.

पुढील जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीपूर्वी २५ वरील प्रलंबित कामे पूर्ण करून त्यांचे प्रत्यक्ष करण्याची कार्यवाही निश्चित करण्यात आली आहे.

वरील उपाययोजनांमध्ये प्रकाश व्यवस्थेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अनेक अपघात रात्रीच्या वेळी रस्त्याची स्थिती, वळण, गतिरोधक किंवा धोकादायक भाग स्पष्ट न दिसल्याने होण्याची शक्यता असते. त्यामुळे आवश्यक ठिकाणी , आणि यांची व्यवस्था करण्यावर भर देण्यात आला आहे. यासोबतच वाहनचालकांना धोकादायक ठिकाणाची पूर्वकल्पना मिळावी यासाठी सुरक्षा फलक आणि यांचा वापर करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील रस्ते अधिक सुरक्षित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित यंत्रणा, स्थानिक प्रशासन आणि इतर संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

२५ वरील प्रलंबित कामे, दोदडगाव येथील नवीन , नांजा फाट्यावरील गतिरोधक, रस्त्यालगतच्या धोकादायक विहिरी तसेच अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाई या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करून रस्ता सुरक्षा अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. संबंधित विभागांनी बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही निर्धारित वेळेत पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील अपघातप्रवण ठिकाणांवर केवळ अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी अपघात होण्याची संभाव्य कारणे आधीच ओळखून ती दूर करण्याच्या दिशेने प्रशासनाने पावले उचलली आहेत. दोदडगावला नवीन घोषित करणे, नांजा फाट्यावर गतिरोधकास मंजुरी देणे, रस्त्यालगतच्या विहिरी सुरक्षित करणे आणि २५ वरील कामांचे प्रत्यक्ष करण्याचा निर्णय यामुळे रस्ता सुरक्षेच्या उपाययोजनांना आता अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे

# संपादकीय...

## रात्रीची वीज गायब, मग विकासाची भाषा कशासाठी?

मंठा तालुक्यातील लावणी गावातील ग्रामस्थांना रात्रीची वीज मिळत नाही, म्हणून त्यांना थेट महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करावे लागते, ही बाब केवळ एका गावापुरती मर्यादित राहणारी नाही. ग्रामीण भागातील मूलभूत वीजपुरवठ्याच्या व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ही परिस्थिती आहे. वीज ही आज चैनीची सुविधा राहिलेली नाही. घरातील पंखा, दिवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांचा अभ्यास, शेतीसाठी विद्युत मोटार, मोबाईल चार्जिंगपासून छोट्या व्यवसायापर्यंत प्रत्येक गोष्ट विजेवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत वारंवार वीज खंडित होत असेल आणि विशेषतः रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध होत नसेल, तर त्याचा परिणाम थेट नागरिकांच्या जीवनमानावर होतो.
लावणीच्या ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वीजपुरवठ्याच्या समस्येबाबत यापूर्वी अनेकदा तक्रारी करण्यात आल्या. तरीही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. त्यामुळे ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. यातून सर्वात महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतोनागरिकांनी आंदोलन केल्याशिवाय प्रशासन जागे होते का? एखाद्या गावातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असेल, तर त्यामागे तांत्रिक बिघाड, ओव्हरलोड, जीर्ण वाहिन्या, ट्रान्सफॉर्मरची क्षमता, देखभालीचा अभाव किंवा अन्य कारणे असू शकतात. मात्र कारण कोणतेही असो, त्याचे निदान करून कायमस्वरूपी उपाय करणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. फक्त बिघाड झाला की दुरुस्ती करणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. बिघाड वारंवार का होतो, हा मूळ प्रश्न शोधणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात वीजपुरवठ्याचा प्रश्न अधिक गंभीर असतो. शेतकऱ्यांची शेती विद्युत पंपावर अवलंबून असते. सिंचनाचे नियोजन विजेच्या उपलब्धतेनुसार करावे लागते. रात्री वीज येईल म्हणून शेतकऱ्याला मध्यरात्री शेतात जावे लागत असेल आणि तिथे पोहोचल्यानंतर वीज गायब असेल, तर त्याचा वेळ, श्रम आणि खर्च वाया जातो. शिवाय रात्रीच्या वेळी शेतात जाण्याशी संबंधित सुरक्षेचे प्रश्नही निर्माण होतात. शेतकऱ्याला वीज कधी मिळणार हेच निश्चित नसेल, तर तो शेतीचे नियोजन कसे करणार?
शेतीचा खर्च वाढत असताना अनियमित वीजपुरवठा हा शेतकऱ्याच्या अडचणीत आणखी भर घालणारा घटक ठरतो.
लावणीतील ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होणाऱ्या परिणामाकडेही लक्ष वेधले आहे. हा मुद्दा विशेष गंभीर आहे.
ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांकडे अभ्यासासाठी स्वतंत्र सुविधा नसतात. घरातच रात्रीच्या वेळी अभ्यास केला जातो. त्याच वेळी वीज नसेल तर विद्यार्थ्यांना अभ्यास थांबवावा लागतो. आज शिक्षणामध्ये डिजिटल साधनांचे महत्त्व वाढले आहे. मोबाईल, संगणक, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि इंटरनेट यांचा वापर वाढत असताना अखंडित वीज ही शिक्षणाचीही मूलभूत गरज बनली आहे. एका बाजूला ग्रामीण विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये आणि विविध क्षेत्रांत पुढे यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते; दुसऱ्या बाजूला त्यांना रात्री अभ्यासासाठी वीज मिळत नसेल तर ही विसंगती दूर कोण करणार?
ग्रामस्थांच्या आंदोलनानंतर एखादा कर्मचारी येऊन बिघाड दुरुस्त करेल आणि दोन-चार दिवस वीज सुरळीत राहील, एवढ्यावर हा प्रश्न संपता कामा नये. महावितरणने लावणी गावातील वीजपुरवठ्याचे तांत्रिक ऑडिट करण्याची गरज आहे. वारंवार बिघाड होणारे पोल, वाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, फीडर आणि इतर यंत्रणेची तपासणी करून नेमकी समस्या कुठे आहे, हे शोधले पाहिजे. जर क्षमता अपुरी असेल तर क्षमता वाढविणे, वाहिन्या जीर्ण असतील तर त्यांची दुरुस्ती किंवा बदल करणे, ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार असेल तर योग्य नियोजन करणे आणि वारंवार बिघाडाची कारणे शोधून प्रतिबंधात्मक देखभाल करणे आवश्यक आहे.

दैनिक युवा आदर्श दि. २७-०८-२०२६
CHANGE IN NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
SULTANA PATHAN
To New Name
SULATANABI NURAKHAN PATHAN
For Passport Issuence
Add- Valmik Nagar New Jalna, Kadrabad, Jalna. 431203

दैनिक युवा आदर्श दि. २७-०८-२०२६
CHANGE IN NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
FARJANA NOORKHAN PATHAN
To New Name
FARJANABI BISMILA PATHAN
For Passport Issuence
Add- WALMIK NAGAR, BHIM NAGAR, JALNA, DIST. JALNA., Jalna, 431203.

# अजरामर पार्श्वगायक मुकेश!

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन. आपल्या दर्दभऱ्या, भावस्पर्शी आणि मनाला भिडणाऱ्या आवाजाने तीन दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे मुकेश आजही आपल्या स्वरांच्या माध्यमातून रसिकांच्या हृदयात जिवंत आहेत. त्यांच्या निधनाला अनेक दशके उलटली, तरी त्यांच्या आवाजाची जादू आजही कायम आहे.
२२ जुलै १९२३ रोजी दिल्ली येथे मुकेश यांचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथुर असे होते. त्यांचे बालपण दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौक परिसरात गेले. त्यांचे वडील जोरावर चंद माथुर हे अभियंता होते, तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना लहानपणापासूनच संगीताची विशेष आवड होती. त्या काळातील महान गायक कुंदनलाल सहगल यांचे ते निस्सीम चाहते होते. सहगल यांच्याप्रमाणेच अभिनेता आणि गायक होण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. मुकेश यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना त्यांच्या एका नातेवाइकाच्या लग्नात घडली. त्या वेळी प्रसिद्ध अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना गाताना ऐकले. त्यांच्या आवाजाने मोतीलाल इतके प्रभावित झाले की, या तरुणाचा आवाज भविष्यात हिंदी चित्रपटसृष्टीत मोठी ओळख निर्माण करेल, असा त्यांना विश्वास वाटला. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी पंडित जगन्नाथ प्रसाद यांच्याकडे पाठवले.
मुकेश यांना अभिनयाचीही आवड होती. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना काही चित्रपटांमध्ये अभिनयाच्या संधी मिळाल्या. १९४१ मध्ये 'निर्दोष' या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतरही त्यांनी काही चित्रपटांमध्ये भूमिका केल्या; मात्र अभिनय क्षेत्रात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे नायक होण्याचे स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी आपले संपूर्ण लक्ष गायनाकडे केंद्रित केले. १९४५ मध्ये 'पहली नजर' या चित्रपटातून मुकेश यांना पार्श्वगायक म्हणून मोठी संधी मिळाली. या चित्रपटातील 'दिल जलता है तो जलने दो' हे गीत अत्यंत लोकप्रिय झाले. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या गायनशैलीचा प्रभाव जाणवत होता. मात्र मुकेश यांनी पुढे स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली.
१९५८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'यहूदी' चित्रपटातील 'ये मेरा दीवानापन है' या गीताने मुकेश यांच्या गायकीला नवी दिशा दिली. या गीतातून त्यांचा स्वतंत्र, भावपूर्ण आणि दर्दभरा आवाज रसिकांसमोर ठळकपणे आला. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने वेग घेतला. 'मेला', 'अंदाज' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या गीतांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. मुकेश आणि राज कपूर यांचे नाते हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक अजरामर पर्व आहे. राज कपूर यांच्या पडद्यावरील व्यक्तिमत्त्वाला मुकेश यांच्या आवाजाने एक वेगळी भावनिक ओळख मिळवून दिली. 'आग', 'बरसात', 'आवारा', 'श्री ४२०', 'परवरिश', 'अनाडी', 'संगम', 'मेरा नाम जोकर' अशा अनेक चित्रपटांतील गाणी लोकप्रिय झाली. त्यामुळे 'राज कपूर यांचा आवाज' अशी मुकेश यांची ओळख निर्माण झाली. मुकेश यांच्या आवाजाची खासियत म्हणजे त्यातील नैसर्गिक भावुकता. त्यांच्या आवाजात कृत्रिमता नव्हती. प्रेम, विरह, दुःख, एकाकीपणा, आशा आणि जीवनातील संघर्ष या भावना ते अत्यंत सहजतेने व्यक्त करीत. त्यामुळे त्यांचे गीत ऐकताना ते केवळ गाणे ऐकत असल्याची भावना होत नसे, तर एखादी हृदयस्पर्शी कथा आपल्या मनासमोर उलगडत असल्याचा अनुभव येत असे. मुकेश यांनी हिंदी चित्रपटसंगीताला असंख्य अविस्मरणीय गीते दिली. 'दोस्त दोस्त ना रहा', 'जीना यहाँ मरना यहाँ', 'कहीं दूर जब दिन ढल जाए', 'मैं पल दो पल का शायर हूँ' यांसारख्या त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर राज्य केले. त्यांच्या स्वरांमध्ये जीवनातील वेदना व्यक्त करण्याची विलक्षण ताकद होती. म्हणूनच त्यांना 'दर्दभरा आवाज' अशी ओळख मिळाली.
१९७६ मध्ये राज कपूर यांच्या 'सत्यम शिवम सुंदरम' या चित्रपटासाठी गाण्याचे ध्वनिमुद्रण करून मुकेश अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. २७ ऑगस्ट १९७६ रोजी अमेरिकेतील डेट्रॉईट येथे त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच राज कपूर यांनी, ''आज माझा आवाज कायमचा हरपला,'' अशी हृदयस्पर्शी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीने एक महान पार्श्वगायक गमावला. मुकेश यांना त्यांच्या कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. 'रजनीगंधा' चित्रपटातील 'कई बार यूँ ही देखा है' या गीतासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. तसेच त्यांना चार वेळा फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले. मात्र पुरस्कारांपेक्षाही आपल्या चाहत्यांच्या हृदयात मिळालेले स्थान हेच त्यांच्या कलेचे खरे यश होते.
मुकेश यांचा आवाज हा केवळ एक स्वर नव्हता; तो भावनांचा स्पर्श होता. त्यांच्या गाण्यांमधून व्यक्त होणारा दर्द, प्रेम आणि जीवनाचे तत्त्वज्ञान आजही रसिकांना अंतर्मुख करते. काळ बदलला, संगीताच्या शैली बदलल्या, तंत्रज्ञान बदलले; परंतु मुकेश यांच्या स्वरांची मोहिनी मात्र आजही कायम आहे.
काही गायक काळाच्या ओघात विस्मृतीत जातात; पण काही स्वर काळावर मात करून अजरामर होतात. मुकेश हे अशाच अजरामर स्वरांचे गायक होते. त्यांच्या आवाजात भारतीय मनातील सुख-दुःख, प्रेम-विरह आणि जीवनातील असंख्य भावनांचे प्रतिबिंब उमटले होते. म्हणूनच मुकेश आज आपल्यात नसले तरी त्यांचा आवाज प्रत्येक पिढीला पुन्हा पुन्हा आपलासा वाटतो. अजरामर स्वरांना मृत्यू नसतो; ते गीतांच्या रूपाने सदैव जिवंत राहतात.
स्मृतिदिनी या महान, अजरामर पार्श्वगायक मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## पान १ व ४ वरुन...

### अल्प पावसाने

केली आहे.''मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. शासनाने संवेदनशील भूमिका घेत पीक विमा, विशेष आर्थिक पॅकेज, कर्ज सवलत तसेच पाणी व चारा उपलब्ध करून देत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे,'' असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केले आहे.
अल्प पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाकडून कोणते निर्णय घेतले जातात, याकडे मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### चंदनझिरा पोलीस...

सुसज्ज आणि नागरिकाभिमुख वातावरण उपलब्ध होणार आहे.
चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात एमआयडीसीसह विविध भागांचा समावेश असून, औद्योगिक व नागरी विस्तारामुळे पोलिसांच्या जबाबदाऱ्यांमध्येही वाढ झाली आहे. नवीन इमारतीत आवश्यक प्रशासकीय सुविधा उपलब्ध झाल्यानंतर गुन्ह्यांचा तपास, नोंदणी, कागदपत्रांचे व्यवस्थापन, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या कामकाजाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे.
स्वतंत्र इमारत उपलब्ध झाल्यामुळे पोलीस दलाच्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुधारणा होऊन पोलिसांच्या कार्यक्षमतेतही वाढ होण्यास मदत होणार आहे.
२७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या भूमिपूजन कार्यक्रमास खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, विधान परिषद सदस्य सुहास शिरसाट तसेच छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांची उपस्थिती राहणार आहे.
याशिवाय जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. चंदनझिरा पोलीस ठाण्याची स्थापना झाल्यापासून स्वतंत्र इमारतीची आवश्यकता होती. अखेर नवीन इमारतीच्या भूमिपूजनामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनची ही प्रतीक्षा संपण्याच्या मार्गावर आली आहे. नवीन इमारत ही केवळ पोलिसांसाठी कार्यालयीन सुविधा नसून नागरिकांना अधिक प्रभावी, तत्पर आणि सुरक्षित पोलीस सेवा देण्यासाठी महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरणार आहे.
'सुरक्षित जालना, सक्षम पोलीस व्यवस्था आणि नागरिकाभिमुख पोलीस सेवा' या उद्दिष्टाच्या दिशेने चंदनझिरा पोलीस ठाण्याची नवीन इमारत महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.
या भूमिपूजन कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक किरण बिडवे तसेच संबंधित बांधकाम संस्थांच्या प्रतिनिधींनी केले आहे.

### राखी पौर्णिमेनिमित्त...

सामाजिक ऐक्याचा संदेश दिला गेल्याचे संदर्भ आढळतात. त्यामुळे रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीपुरता मर्यादित न राहता परस्पर स्नेह आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण म्हणूनही पाहिला जातो.
राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील बाजारपेठेत वाढलेली गर्दी पाहता यंदाही नागरिकांमध्ये या सणाबद्दल मोठा उत्साह असल्याचे दिसून येत आहे. बहिणींच्या हातात राख्यांची खरेदीची पिशवी आणि बाजारपेठेत दिसणारी लगबग यामुळे शहरात रक्षाबंधनाचा उत्सवी माहोल निर्माण झाला आहे.

### ग्रामरोजगार...

रोजगार हमी कायदा हा केंद्रीय कायदा आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीत महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांना केंद्रीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व त्यानुसार सेवा-सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.
बैठकीत ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात वाढ, सेवा-सुरक्षा, शासन निर्णयांची अंमलबजावणी, अन्यायग्रस्त रोजगार सेवकांना न्याय, तसेच भविष्यातील संघटनात्मक व आंदोलनात्मक कार्यक्रम याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.
ग्रामरोजगार सेवकांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा जिल्ह्यातील ग्रामरोजगार सेवकांना एकत्रित करून तीव्र व व्यापक आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.
या बैठकीला रोजगारा सेवक संघटनेचे नेते मारोती खंदारे व अनिल मिसाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सुनील डोळसे, रोहित चटाप, दिलीप उढाण, परमेश्वर पावसे, विकास राठोड,देविदास चव्हाण, नामदेव सदर, दिलीप मोरे,ज्ञानेश्वर नाईकवाडे, खुद्दस चाऊस, अनिल सांगुळे, विष्णू राठोड,विष्णू मोरे, नितेश जाधव यांच्या सह अनेक रोजगार सेवक उपस्थित होते.

### महिला आर्थिक...

रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यामुळे एका उपक्रमातून महिला शेतकरी, बचत गट आणि स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्था अशा अनेक घटकांना लाभ मिळत आहे.

**५४ महिला उत्पादक कंपन्यांकडून कृषी निविष्ठांचा पुरवठा**

कृषी निविष्ठांच्या क्षेत्रातही 'उमेद'च्या माध्यमातून महिलांना नवी संधी उपलब्ध झाली आहे. राज्यातील ५४ महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे बियाणे व खत विक्रीसाठी आवश्यक परवाने उपलब्ध आहेत. या माध्यमातून सुमारे ५४ हजार महिला सभासदांना सेवा दिली जात आहे. महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आपल्या सभासदांची मागणी एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करतात. सामूहिक खरेदीमुळे दर्जेदार निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे. परिणामी शेतकऱ्यांचा निविष्ठांवरील खर्च आणि बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेनेही या उपक्रमाची वाटचाल सुरू आहे.

**रेशन दुकानापासून वीट निर्मितीपर्यंत**

'उमेद' अभियानाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला कृषी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता विविध व्यवसायांपर्यंत विस्तार दिला आहे. राज्यात स्वयं-सहाय्यता समूहांच्या माध्यमातून रेशन दुकाने, सिमेंट एजन्सी, वीट निर्मिती, केरोसीन एजन्सी आणि टाईल्स निर्मिती यांसारखे व्यवसायही महिलांकडून चालविले जात आहेत. ३२ स्वयं-सहाय्यता समूहांमधील ५८ महिला रेशन दुकाने, तर एका स्वयं-सहाय्यता समूहातील २३ महिला सिमेंट विक्रीचा व्यवसाय सांभाळत आहेत. दोन समूहांमधील २४ महिला वीट निर्मिती व्यवसायात कार्यरत आहेत. याशिवाय दोन महिला केरोसीन एजन्सी, तर दोन महिला टाईल्स निर्मितीचा व्यवसाय चालवत आहेत.

**बचत गटातून उद्योजकतेकडे**

'उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा प्रवास बचत आणि कर्जाच्या चौकटीपलीकडे जाऊन उद्योजकतेकडे होत आहे. व्यवसाय व्यवस्थापन, वित्तीय समावेशन आणि बाजारपेठेशी जोडणी यासाठी संस्थात्मक पाठबळ मिळत असल्याने महिलांची निर्णयक्षमता आणि आर्थिक स्वावलंबन वाढत आहे. ग्रामीण भागातच रोजगार आणि नियमित उत्पन्नाच्या संधी उपलब्ध झाल्याने महिलांच्या कौटुंबिक उत्पन्नाला हातभार लागत आहे. त्याचवेळी गावातील नागरिकांनाही आवश्यक वस्तू आणि सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत. महिला स्वयंसहाय्यता समूहांची सामूहिक ताकद, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला संस्थात्मक पाठबळ यांचा संगम घडवून 'उमेद' अभियान ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच गावच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी देत आहे. शेतीतील यांत्रिकीकरणापासून व्यवसायाच्या व्यवस्थापनापर्यंत महिलांचा वाढता सहभाग हा ग्रामीण महाराष्ट्राच्या बदलत्या आर्थिक चित्राचा महत्त्वपूर्ण भाग ठरत आहे.

### रोटरी क्लब...

लक्षात घेऊन वेगवेगळे आणि उपयुक्त विषय निवडले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार योग्य मार्गदर्शन मिळते. आमचे हे प्रयत्न विद्यार्थ्यांसाठी निश्चितच एक संस्मरणीय आणि ज्ञानवर्धक अनुभव ठरतील, असा आम्हाला विश्वास आहे. आजच्या काळात केवळ चांगले गुण आणि पदव्या पुरेशा नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जागरूकता, संवादकौशल्य, व्यावहारिक ज्ञान आणि बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची क्षमता असणेही तितकेच आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.
याप्रसंगी डॉ. नितीन खंडेलवाल, सपना गोयल, डॉ. तरूणा छाबडा, पंकज लड्डा, डॉ. आरती मंत्री, रोटरी क्लब जालना इलाइटचे सचिव गणेश बाले यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार सचिव डॉ. अतुल जिंतूरकर यांनी मानले.

### 'खेलो इंडिया...

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, भारतीय क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आपल्या कल्पना व सूचना मांडाव्यात आणि 'विकसित भारत' घडविण्याच्या राष्ट्रनिर्माण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेपाळमध्ये अडकलेल्या जालना जिल्ह्यातील पर्यटकांनी आपत्कालीन केंद्राशी संपर्क साधावा

## रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला पूर; संपर्क तुटलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाकडून संकलित

**जालना । प्रतिनिधी**

नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील नेपाळमध्ये प्रवासासाठी गेलेल्या पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत जिल्हा प्रशासनाकडून माहिती संकलित केली जात आहे. नेपाळमध्ये अडकलेले अथवा ज्यांचा आपल्या कुटुंबीयांशी संपर्क होत नसलेले जालना जिल्ह्यातील पर्यटक आणि नागरिक यांनी तातडीने जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जालना यांनी केले आहे.
नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला पूर आल्याने काही भागातील जनजीवनावर परिणाम झाला आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. जालना जिल्ह्यातून नेपाळमध्ये पर्यटनासाठी किंवा अन्य कारणासाठी गेलेल्या नागरिकांपैकी कोणी पूरस्थितीमुळे अडकले असल्यास त्यांची माहिती प्रशासनाला मिळणे आवश्यक आहे.

**कुटुंबीयांनीही माहिती द्यावी**

नेपाळमध्ये असलेल्या जालना जिल्ह्यातील नागरिकांचा संपर्क होत नसल्यास त्यांच्या कुटुंबीयांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. संबंधित पर्यटक किंवा नागरिकाचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण अथवा हॉटेलचे नाव, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो प्रशासनाला द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.
प्राप्त माहितीच्या आधारे प्रशासनाला संबंधित व्यक्तीचा शोध घेणे, त्यांच्या सुरक्षिततेबाबत माहिती मिळविणे तसेच आवश्यकतेनुसार संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे सुलभ होणार आहे.

**या क्रमांकांवर साधा संपर्क**

नेपाळमध्ये अडकलेल्या जालना जिल्ह्यातील पर्यटक किंवा त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपर्क साधावा.
दूरध्वनी : ०२४८२-२२३१३२
टोल फ्री : १०७७ जिल्ह्यातील नागरिकांनी अफवा किंवा अपुऱ्या माहितीकडे लक्ष न देता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक माहिती संकलित करून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहेत. पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर नेपाळमध्ये प्रवास करणाऱ्या जालना जिल्ह्यातील नागरिकांनीही आपल्या कुटुंबीयांशी नियमित संपर्क ठेवावा आणि स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षा सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रक्षाबंधनाला बहिण-भावांप्रमाणे ;पृथ्वीला सुध्दा वृक्ष लागवडीच्या बंधनाची गरज

रक्षाबंधन हा पवित्र सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखीपौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण मानला जातो.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये‘‘नारळी पौर्णिमा‘‘या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात.चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.

यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी ‘‘जान जाये पर वचन न जाये‘‘अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या अतुट बंधन;म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो आणि नवीन उर्जा प्राप्त होते.यामुळे बहिण - भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण-भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे व बदलत्या हवामानामुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन,भूकंप,सुनामी,ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत सोबतच आता अलनिनोचा प्रभाव वाढत आहे याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता, अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.

परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक-एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल,अलनिनोचा प्रभाव कमी होईल अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव,राष्ट्रीय कार्यक्रम,आंतरराष्ट्रीय कार्यक्रम,वाढदिवस अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे. सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये,सामाजिक संस्था यांनी या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# चंदनझिरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई; खुनाचा मुख्य आरोपी १२ तासांत जेरबंद

### झिरो पॉईंटवरील निखील पवार हत्या प्रकरण; आणखी तीन आरोपी फरार, पोलिसांकडून युद्धपातळीवर शोध सुरू

**जालना । प्रतिनिधी**

चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील झिरो पॉईंट परिसरात धारदार चाकूने वार करून युवकाची हत्या केल्याच्या घटनेनंतर निर्माण झालेली तणावपूर्ण परिस्थिती पोलिसांनी अत्यंत संयम आणि कौशल्याने हाताळली. या प्रकरणातील मुख्य आरोपी संतोष ऊर्फ पिंट्या हरीभाऊ लांडे (रा. नागेवाडी) याला अवघ्या १२ तासांच्या आत अटक करण्यात चंदनझिरा पोलिसांना यश आले आहे. दरम्यान, गुन्ह्यातील आणखी तीन आरोपी फरार असून त्यांचा पोलिसांकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे.




झिरो पॉईंट परिसरात २५ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास निखील परमेश्वर पवार (रा. नागेवाडी) याच्यावर धारदार चाकूने वार करण्यात आले. या हल्ल्यात निखील पवार याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रकरणी मयताचा नातेवाईक श्याम पवार यांच्या तक्रारीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन गुन्ह्याचा कसून तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी पथकासह तपासाला सुरुवात केली. घटनास्थळाची पाहणी, उपलब्ध माहितीचे संकलन, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला.

पोलिसांच्या अथक प्रयत्नांनंतर मुख्य संशयित आरोपी संतोष ऊर्फ पिंट्या हरीभाऊ लांडे याचा ठावठिकाणा निश्चित करून त्याला अवघ्या १२ तासांत अटक करण्यात आली.

**२९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी**

अटक केलेल्या आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला २९ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील आणखी तीन आरोपी अद्याप फरार असून, त्यांच्या शोधासाठी पोलिसांची विविध पथके कार्यरत आहेत. या आरोपींचा शोध घेण्यासाठी संभाव्य ठिकाणी तपास करण्यात येत आहे. या खून प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

खूनाच्या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असतानाही चंदनझिरा पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून संयम आणि दक्षता राखली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू न देता कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात ठेवण्यात यश आले.

गुन्ह्याचा तातडीने तपास करून मुख्य आरोपीला १२ तासांत जेरबंद केल्याने नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. गंभीर गुन्हा करून आरोपी फरार झाला तरी तो कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाही, असा संदेश या कारवाईतून पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, झिरो पॉईंट परिसरातील शासकीय मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणांवरही प्रशासनाने संयुक्त कारवाई केली आहे. परिसरात हॉटेल, टपऱ्या आणि इतर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली होती. त्यामुळे परिसरात गर्दी वाढून वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वावर वाढण्याची शक्यता आणि अपघाताचा धोका निर्माण झाला होता.

नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक सुरळीत ठेवणे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासन, महानगरपालिका आणि एमआयडीसी प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई केली. या कारवाईत झिरो पॉईंट परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे, हॉटेल, टपऱ्या आणि इतर अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.

अतिक्रमणे हटविल्यामुळे परिसर मोकळा झाला असून वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास तसेच भविष्यातील अनुचित प्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, चंदनझिरा पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह दिगंबर पवार, निता दामधर, सय्यद अफसर, मारीयो स्कॉट, राजेंद्र ठाकुर, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजू पवार, अभिजीत वायकोस, मदन बहुरे, विशाल लोखंडे, शरद पवार, संतोष वनवे, सागर खैरे, नवनाथ पाटील तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पवन राजपूत व हारुण पठाण यांच्या पथकाने केली. खून प्रकरणातील उर्वरित आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू असून, या कारवाईकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जालन्यातील दोन रेल्वे पुलांसाठी ९७.६२ कोटींची मंजुरी

### आ. अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; बायपासवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्याची अपेक्षा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील बायपास वळण रस्त्यावर वारंवार निर्माण होणारी वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने दोन महत्त्वपूर्ण रेल्वे पुलांच्या कामांना ९७.६२ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या मंजुरीमुळे मोठे यश मिळाले आहे. या दोन्ही पुलांची कामे पूर्ण झाल्यानंतर बायपास मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. जालना शहरातील कुंडलिका नदीजवळील विद्यमान रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन समांतर रेल्वे पूल उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोतीबाग रेल्वे पुलाचे चौपदरीकरण करण्यात येणार आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने हे दोन्ही प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. जालना शहरातील बायपास वळण रस्ता चौपदरी असून, या मार्गावरील रेल्वे पुलांवर सध्या दोन्ही दिशेची वाहतूक एकाच पुलावरून होत आहे. परिणामी वाहनांची संख्या वाढल्यानंतर या पुलांवर वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत होती. विशेषतः सकाळ-संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळेत वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येची गंभीर दखल घेत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. नवी दिल्ली येथे त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची भेट घेऊन जालना शहरातील रेल्वे पुलांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या निदर्शनास आणून दिली.

कुंडलिका नदीजवळील विद्यमान रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन समांतर पूल बांधण्यात येणार आहे. त्यामुळे दोन्ही दिशेची वाहतूक स्वतंत्रपणे करण्यास मदत होणार असून, या भागातील वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे. तसेच मोतीबाग परिसरातील विद्यमान रेल्वे पुलाचे पुनर्बांधकाम करून चौपदरी पूल उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. दोन्ही कामांसाठी मिळून ९७.६२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण प्रकल्पांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा आहे. पूल प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बायपास मार्गावरून जाणाऱ्या वाहनांना मोठा दिलासा मिळणार आहे. जालना शहरातून बाहेर जाणाऱ्या तसेच शहरात येणाऱ्या वाहनांची वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असून, प्रवासाचा वेळही कमी होण्याची शक्यता आहे. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता प्रमुख मार्गांवरील वाहतूक व्यवस्था सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे. बायपास वळण रस्ता आणि रेल्वे पुलांचे काम यापूर्वी युती सरकारच्या काळात आपण करून घेतले होते. मात्र, वाढत्या वाहतुकीमुळे आता या पुलांचे विस्तारीकरण आणि नवीन समांतर पूल आवश्यक झाले होते. त्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. दोन्ही रेल्वे पुलांच्या कामांसाठी ९७.६२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून प्रत्यक्ष कामाचा मार्ग मोकळा केल्याबद्दल खोतकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे आभार मानले. जालना शहराच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी हा महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. रेल्वे पुलांवरील कोंडी कमी करण्यासाठी होणारी ही दोन्ही कामे पूर्ण झाल्यानंतर बायपास मार्गाची वाहतूक क्षमता वाढणार आहे. त्यामुळे शहरातील अंतर्गत वाहतुकीवरील ताण कमी होण्यासही मदत होण्याची शक्यता आहे. ९७.६२ कोटींच्या या प्रकल्पामुळे जालना शहराच्या वाहतूक आणि दळणवळण व्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा असून, प्रत्यक्ष काम कधी सुरू होते आणि ते किती वेगाने पूर्ण होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बांगलादेश, सौदी-तुर्की-पाकिस्तानच्या लष्करी आघाडीत सहभागी होण्याचा प्रयत्न; भारताने सावध राहण्याची गरज

बांगलादेशातील बदलत्या राजकीय परिस्थितीचा परिणाम आता केवळ त्या देशाच्या अंतर्गत राजकारणापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्याचे पडसाद दक्षिण आशियातील सामरिक आणि राजनैतिक समीकरणांवरही उमटताना दिसत आहेत. बांगलादेश पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की यांच्यासोबत संरक्षण किंवा लष्करी सहकार्य वाढविण्याच्या दिशेने विचार करीत असल्याच्या चर्चेने भारताच्या चिंतेत निश्चितच भर पडली आहे. भारताच्या दृष्टीने ही बाब केवळ एका शेजारी देशाच्या परराष्ट्र धोरणातील बदल म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण बांगलादेशाचे भौगोलिक स्थान भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध आहेत. दोन्ही देशांची मोठी सीमा एकमेकांना जोडते. व्यापार, वाहतूक, ऊर्जा, जलव्यवस्थापन, सुरक्षा आणि सीमावर्ती भागातील सहकार्य अशा अनेक क्षेत्रांत दोन्ही देशांचे हितसंबंध परस्परांशी जोडलेले आहेत. त्यामुळे बांगलादेशच्या परराष्ट्र धोरणात भारतविरोधी कल वाढणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

विशेषतः पाकिस्तान आणि तुर्की यांच्याशी बांगलादेशाचे वाढते संरक्षण सहकार्य भारतासाठी संवेदनशील विषय ठरू शकतो. पाकिस्तानचा भारताशी असलेला दीर्घकालीन संघर्ष सर्वश्रुत आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानसोबत बांगलादेशाने संरक्षणविषयक जवळीक वाढविल्यास दक्षिण आशियातील सामरिक समीकरण अधिक गुंतागुंतीचे होऊ शकते. तुर्कीचेही विविध आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील स्वतंत्र धोरण आणि वाढता सामरिक प्रभाव लक्षात घेता या संभाव्य समीकरणाकडे भारताला अत्यंत बारकाईने पाहावे लागेल.

मात्र या परिस्थितीकडे केवळ संघर्षाच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. भारताने भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी मुत्सद्देगिरी, संवाद आणि राष्ट्रीय हित यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. बांगलादेशातील सरकार कोणतेही असो, तेथील जनतेशी भारताचे संबंध कायम राहिले पाहिजेत. सरकारे बदलतात; मात्र शेजारी देशांमधील संबंध दीर्घकाळ टिकणारे असतात.

भारताने बांगलादेशासोबत आर्थिक आणि लोकसंपर्काचे संबंध अधिक मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे. व्यापार वाढविणे, सीमावर्ती भागातील विकासाला चालना देणे, ऊर्जा सहकार्य वाढविणे, वाहतूक आणि संपर्क व्यवस्था सुधारणे तसेच शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविणे यामुळे दोन्ही देशांमधील परस्परावलंबित्व अधिक दृढ होईल. मजबूत आर्थिक संबंध हे अनेकदा राजकीय मतभेदांवर प्रभावी पूल ठरतात. त्याचबरोबर भारताने आपल्या सीमासुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करता कामा नये. बेकायदेशीर घुसखोरी, तस्करी, दहशतवादी कारवायांना मदत करणारे नेटवर्क आणि सीमावर्ती भागातील अस्थिरता यावर कठोरपणे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. शेजारी देशाशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे आणि राष्ट्रीय सुरक्षेचे संरक्षण करणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत. बांगलादेशच्या परराष्ट्र धोरणातील बदल हा तेथील अंतर्गत राजकीय परिस्थितीशीही संबंधित असू शकतो. त्यामुळे प्रत्येक विधान किंवा राजनैतिक हालचालीचा अर्थ भारतविरोधी कट म्हणून लावण्यापेक्षा त्यामागील व्यापक राजकीय आणि सामरिक कारणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारताने परिस्थितीवर बारकाईने नजर ठेवत योग्य वेळी योग्य राजनैतिक पावले उचलली पाहिजेत. दक्षिण आशियात शांतता आणि स्थैर्य टिकविण्यासाठी भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

भारत हा या प्रदेशातील मोठी आर्थिक आणि सामरिक शक्ती असल्याने त्याच्याकडून संयमित आणि दूरदृष्टीची अपेक्षा आहे. शेजारी देशांना दूर लोटण्याऐवजी त्यांना विश्वासात घेणे, आर्थिक विकासाच्या माध्यमातून संबंध मजबूत करणे आणि सुरक्षा विषयांवर स्पष्ट भूमिका घेणे हीच दीर्घकालीन रणनीती ठरू शकते. बांगलादेश पाकिस्तान, तुर्की किंवा इतर कोणत्याही देशासोबत सहकार्य करतो म्हणून भारताने घाबरून जाण्याचे कारण नाही; परंतु त्यातून भारताच्या सुरक्षेला किंवा हितसंबंधांना धोका निर्माण होण्याची शक्यता असेल तर त्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. मैत्रीचा हात पुढे ठेवतानाच सुरक्षेची ढाल मजबूत ठेवणे, हीच भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे.

आजच्या बदलत्या जागतिक राजकारणात कोणताही देश कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो; राष्ट्रीय हित हेच परराष्ट्र धोरणाचे अंतिम सूत्र असते. त्यामुळे बांगलादेशाशी संबंधांमध्ये भारताने भावनिकतेपेक्षा व्यवहार्यता, संघर्षापेक्षा संवाद आणि दबावापेक्षा प्रभावी मुत्सद्देगिरीला प्राधान्य दिले पाहिजे. शेजारी देश स्थिर, शांततापूर्ण आणि भारताशी सहकार्य करणारा राहणे हेच भारताच्या दीर्घकालीन हिताचे आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**







जालना शहरात ठीक ठिकाणी ईद मिलादुन्नबी निमित्त शोभायात्रा जुलूस काढण्यात आली यामध्ये लहान चिमुकले ही मागे नाही तर त्यांनीही मोठ्या उत्साहाने जुलूस मध्ये सहभाग घेतला होता काही ठिकाणी रक्तदान शिबिर तसेच खाऊवाटपचे स्टॉल लावण्यात आले होते. (छाया /जावेद तांबोली )

## महिला आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य;'उमेद'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### कृषी अवजार बँक, कृषी निविष्ठा केंद्रांसह महिलांच्या हातात शेतीची यंत्रे

**मुंबई - प्रतिनिधी**

ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रभावी प्रयत्न राज्य शासन विविध माध्यमातून करत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'च्या माध्यमातून सक्षणीकरणाचे हे काम ग्रामीण भागात यशस्वीपणे व्यापक स्वरुपात सुरू आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, कृषी निविष्ठांची उपलब्धता आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना शाश्वत उत्पन्नाचे साधन मिळत असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 'उमेद' अभियानांतर्गत कृषी अवजार बँक आणि कृषी निविष्ठा केंद्र हे दोन महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी न करता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे.

**४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी**

वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचा सुमारे ४० हजार ८०० महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. या अवजार बँकांमध्ये विविध कृषिपूरक अवजारांसह ट्रॅक्टरचीही सुविधा उपलब्ध आहे. महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे या सुविधा केवळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता समुदायाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.

**शेतीचा खर्च कमी; उत्पादकतेला हातभार**

महागडी कृषी यंत्रे खरेदी करण्याची गरज नसल्याने महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने वेळेत पूर्ण होत असल्याने शेतीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून समुदाय आधारित संस्थांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांच्या व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीमुळे स्थानिक पातळीवर *(पान २ वर)*

## रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे जेईएस महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

### *केवळ पदवी पुरेशी नाही, तर व्यावहारिक ज्ञान व कौशल्यांची गरज-मधुलता भक्कड*

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, जीवनकौशल्ये आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने जेईएस महाविद्यालयात २५ ऑगस्ट रोजी आयोजित 'एड्युफेस्ट एक्सेल' या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य उमेश मोगले, जेईएस फार्मसीचे प्राचार्य प्रा. रणवाल, रोटरी क्लब जालना रेनबोच्या अध्यक्ष मधुलता भक्कड, सचिव डॉ. अतुल जिंतूरकर, कोषाध्यक्ष केतन शाह यांची उपस्थिती होती.




या कार्यशाळेत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. आर्थिक साक्षरता या विषयावर सीए पियुष अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना पैशांचे नियोजन आणि आर्थिक व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले. तणाव व्यवस्थापन आणि जीवनशैली या विषयावर बोलताना विकास कदम यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव हाताळण्याच्या सोप्या पद्धती आणि निरोगी जीवनशैलीवर मार्गदर्शन केले. सॉफ्ट स्किल्स व भावनिक बुद्धिमत्ता या विषयावर महेश माळी यांनी संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि भावनिक समतोलाचे महत्त्व विशद केले. सामाजिक उत्तरदायित्व या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. नितीन गादेवाड यांनी तरुणांनी समाजाप्रती आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. यशोगाथा या सत्रात फार्मासिस्ट संजय काबरा यांनी स्वतःच्या जीवनप्रवासातील अनुभव मांडून विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखवला. प्रास्ताविकपर भाषणात क्लबच्या अध्यक्षा मधुलता भक्कड म्हणाल्या की. आज आपण सर्वजण 'एड्युफेस्ट एक्सेल' या उपक्रमाचा भाग आहोत, याचा मला मनापासून आनंद आणि अभिमान वाटतो. गेल्या १० वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी यशस्वीपणे कार्यरत असलेला हा एक पथदर्शी उपक्रम आहे. जेव्हा आम्ही या प्रकल्पाची सुरुवात केली, तेव्हा आमचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणे हा नव्हता. विद्यार्थ्यांना व्यावहारिक जगाशी जोडणे, त्यांना वास्तविक जीवनातील आव्हाने समजून घेण्याची संधी देणे आणि भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी अधिक सक्षम बनवणे, हा आमचा प्रयत्न होता. 'एड्युफेस्ट एक्सेल' ची एक विशेष बाब म्हणजे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वय, गरजा आणि भविष्यातील आव्हाने *(पान २ वर)*

## विमान कंपनीच्या हलगर्जीपणाला ग्राहक मंचाचा दणका; प्रवाशांना १.१९ लाखांची भरपाई

**जालना – प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान विमान कंपनीच्या निष्काळजीपणामुळे बॅग गहाळ झाल्याप्रकरणी जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने इंडिगो एअरलाइन्सला चांगलाच दणका दिला आहे. सेवेतील त्रुटीबद्दल एअरलाइन्सला दोषी ठरवत, तक्रारदारांना एकूण १ लाख १९ हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. हा निकाल देशभरातील ग्राहकांसाठी एक आदर्श असून, मोठ्या कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावणारा आहे, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी दिली आहे. या प्रकरणातील तक्रारदार मोहम्मद मकबूल हकीम आणि फरहत आरा यांनी ग्राहक तक्रार क्रमांक २६/२०२५ अंतर्गत आयोगाकडे दाद मागितली होती. सौदी अरेबियातून उमराह करून परत येत असताना डम्माम विमानतळावर इंडिगो एअरलाइन्सच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ग्रुपमधील सर्व प्रवाशांचे सामान एकत्रच टॅग केले. प्रत्येक प्रवाशाच्या सामानाची स्वतंत्र तपासणी न करता बॅगेज टॅगचा एक गठ्ठा ग्रुप लीडरकडे देण्यात आला. दिल्ली विमानतळावर उतरल्यावर त्यांच्या पाच बॅगांपैकी एक बॅग गहाळ झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या बॅगेत तब्बल ८९,००० रुपये किमतीच्या वस्तू आणि पवित्र धार्मिक सामग्री होती.

तक्रारदारांनी तात्काळ प्रॉपर्टी इर्रेग्युलॅरिटी रिपोर्ट दाखल करून एअरलाइन्सकडे तक्रार केली. कंपनीने १४ दिवसांत बॅग शोधून देण्याचे आश्वासन दिले, परंतु ते पाळले नाही. उलट, हा बॅग गहाळ होण्याचा प्रकार नसून केवळ विलंबाचा प्रकार आहे, असे सांगून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. या हलगर्जीपणामुळे तक्रारदारांना प्रचंड मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागला, ज्यामुळे त्यांनी ग्राहक आयोगाचा दरवाजा ठोठावला. आयोगाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर इंडिगो एअरलाइन्सच्या कारभारात गंभीर त्रुटी असल्याचे स्पष्ट केले. प्रवाशांच्या सामानाची योग्य काळजी न घेणे ही सेवेतील त्रुटी असल्याचे नमूद करत आयोगाने तक्रारदारांच्या बाजूने निकाल दिला. यानुसार, गहाळ झालेल्या सामानासाठी ८९,००० रुपये, मानसिक त्रासापोटी २०,००० रुपये आणि खटल्याच्या खर्चासाठी १०,००० रुपये अशी एकूण १ लाख १९ हजार रुपयांची भरपाई ३० दिवसांच्या आत देण्याचे आदेश दिले. या मुदतीत रक्कम न दिल्यास त्यावर वार्षिक १०% व्याज आकारले जाईल, असेही निकालात स्पष्ट केले आहे. या निकालावर बोलताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''हा निकाल म्हणजे ग्राहक हक्कांचा मोठा विजय आहे. मोठ्या कंपन्या अनेकदा ग्राहकांना किरकोळ समजून त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. परंतु, या निकालाने हे सिद्ध केले आहे की कायदा सर्वांसाठी समान आहे. महाराष्ट्र आणि विशेषतः जालना जिल्ह्यातील नागरिकांनी यातून बोध घ्यावा. कोणत्याही सेवा पुरवठादाराकडून, मग ती विमान कंपनी असो किंवा अन्य कोणतीही संस्था, जर आपल्यासोबत अन्याय होत असेल तर घाबरून न जाता ग्राहक मंचाकडे दाद मागावी. हा निकाल आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणास्थान आहे आणि तो ग्राहकांना त्यांच्या अधिकारांप्रति जागरूक करतो.''

## श्री संत शिरोमणी सावता माळी गौरव सन्मान पुरस्कार ना. छगनराव भुजबळ यांना प्रदान

**जालना - प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी सावता माळी यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक कार्य केल्याबद्दल ज्येष्ठ नेते नामदार छगनराव भुजबळ यांना श्री संत शिरोमणी सावता माळी गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांच्या हस्ते नाशिक येथे भुजबळ महाविद्यालयात ना. छगनराव भुजबळ यांना सदरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.




संत सावता माळी यांच्या विचारधारेनुसार सामाजिक कार्य केल्याबद्दल हा सन्मान देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा पुरस्कार सावता माळी पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष अश्विन भास्करराव अंबेकर, सचिव दीपक वैद्य, सहसचिव राजू इंगळे, उपाध्यक्ष राहुल रायकर, दशरथ तोंडुळे, मधुकर झरेकर तसेच माळी समाज बांधवांच्या वतीने प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ना. छगनराव भुजबळ यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रीय लोकअदालतीतून प्रलंबित प्रकरणे सामोपचाराने मिटविण्याचे आवाहन

### *१२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन*

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये येत्या १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात येणार आहे. धनादेश अनादर, अपघात भरपाई, कौटुंबिक व दिवाणी वाद सामोपचाराने मिटविण्याची सुवर्णसंधी पक्षकारांना उपलब्ध होणार असून, अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्यामार्फत करण्यात आले आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये ही लोकअदालत आयोजित केली जाणार आहे. लोकअदालतीमध्ये धनादेश अनादर प्रकरणे, मोटार अपघात नुकसानभरपाई दावे, कौटुंबिक व वैवाहिक वाद, दिवाणी दावे (जमीन, मालमत्ता, वाटप, भाडेकरू वाद आदी), तडजोडपात्र फौजदारी गुन्हे तसेच बँकिंग, वीज वितरण कंपन्या आणि फायनान्स कंपन्यांशी संबंधित दाखलपूर्व (-) प्रकरणे तडजोडीसाठी ठेवता येणार आहेत. तसेच कामगार, औद्योगिक, सहकार न्यायालय व ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रलंबित प्रकरणांचाही समावेश करण्यात आला आहे. लोकअदालतीचा महत्त्वाचा फायदा म्हणजे कोर्ट फी परतावा. लोकअदालतीत तडजोडीने वाद मिटल्यास पक्षकारांनी भरलेली न्यायालयीन फी नियमानुसार परत मिळते. तसेच लोकअदालतीच्या निवाड्याविरुद्ध अपीलची आवश्यकता नसल्याने प्रकरणाचा कायमस्वरूपी निपटारा होतो. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाचण्यासोबतच परस्पर सलोखा व नातेसंबंध टिकून राहण्यास मदत होते.

ज्या पक्षकारांची प्रलंबित किंवा दाखलपूर्व प्रकरणे सामोपचाराने मिटवायची आहेत, त्यांनी आपल्या संबंधित वकिलामार्फत प्रकरण लोकअदालतीत दाखल करावे. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट' कार्यक्रमाचे जालना येथे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

आगामी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर मेरा युवा भारत ( ), जालना यांच्या सहकार्याने जे.ई.एस. महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना () यांच्या वतीने 'खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. यानिमित्त युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका अधिक बळकट करणे, या उद्देशाने देशभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

'युवा कनेक्ट' उपक्रमाच्या माध्यमातून युवक, खेळाडू, युवा नेते, स्वयंसेवक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणून भारतातील क्रीडा क्षेत्राचा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि भविष्यातील संधी यावर संवाद साधण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आभासी संवाद. देशभरातील विविध ठिकाणांहून लाखो युवक या उपक्रमाशी जोडले जाणार असून, जालना जिल्ह्यातील युवकांनाही या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवक, स्वयंसेवक, स्वयंसेवक आणि स्थानिक खेळाडू यांच्यात विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास, क्रीडा क्षेत्रातील उपलब्ध संधी, ग्रामीण व तळागाळातील खेळाडूंना प्रोत्साहन तसेच भारतात विकसित होत असलेल्या क्रीडा परिसंस्थेबाबत विचारमंथन करण्यात येणार आहे.

यावेळी आयोजित 'युवा संवाद' मध्ये युवकांना भारतीय क्रीडा क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात आपल्या कल्पना, सूचना व आकांक्षा मांडण्याची संधी मिळणार आहे. क्रीडा परिसंस्थेचे बळकटीकरण, २०३६ ऑलिम्पिकसाठी क्रीडा प्रतिभेचे संवर्धन, युवा नेतृत्व व प्रशासनातील सहभाग आणि विकसित भारतासाठी युवा सक्षमीकरण या विषयांवर विशेष चर्चा होणार आहे.

युवकांच्या सूचना व कल्पना कोडच्या माध्यमातून संकलित करण्यात येणार असून, उपस्थित युवकांना मध्ये सहभागी होण्यासाठीही प्रोत्साहित केले जाणार आहे. मेरा युवा भारत ( ), जालना, जे.ई.एस. महाविद्यालय आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय यांच्या वतीने जिल्ह्यातील युवकांनी *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.